# डिसेंबरमध्ये धावणार पहिली भूमिगत मेट्रो

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गिकेतील आरे ते बीकेसी या पहिला टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. नोव्हेंबर महिन्यात या मार्गावर चाचण्या सुरू केल्या जाणार आहेत. त्यानंतर साधारण डिसेंबर महिन्यात पहिल्या टप्प्यातील मार्गिका सुरू करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन प्रयत्नशील आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ हा राज्यातील पहिला भूमिगत मेट्रो प्रकल्प असून दोन टप्प्यात हा प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे. त्यातील आरे ते बीकेसी असा पहिला टप्पा असून दुसरा टप्पा बीकेसी ते कफपरेड असणार आहे.

या मार्गिकेतील आरे ते बीकेसी असा पहिला टप्पा वाहतूकीसाठी सज्ज झाला असून नोव्हेंबर महिन्यात या मार्गावरील विविध चाचण्या पार पाडल्या जाणार आहेत. पण या चाचण्या कोणत्या तारखेपासून सुरू केल्या जाणार आहेत याबाबत कोणतीही निश्चिती अद्याप दिली नाही.

या अगोदर ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला एमएमआरसीने एमआयडीसी ते विद्यानगरी मेट्रो स्टेशन



दरम्यान चाचणी घेतली होती. यावेळी ट्रेनने सुमारे १७ किमी अंतर कापून सीप्झपर्यंत परतीचा प्रवास केला होता.

चाचण्या पूर्ण करून मेट्रो आयुक्त, मेट्रो रेल्वे सुरक्षा (सीएमआरएस) यांच्याकडून सुरक्षा प्रमाणपत्र घेत प्रत्यक्ष मेट्रो वाहतूक सेवेत दाखल करण्यासाठी काही वेळ लागणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील मार्गिका सुरू करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिलेल्या डिसेंबरपर्यंतच्या वेळेवर साशंकता व्यक्त केली जात आहे.